ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I / II

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | आदिवासी साहित्यातील स्त्रीजीवन<br>**श्री केशव धोंडिबा टिपरसे** | ५८-६४ |
| १३ | सीमाभागातील विद्यापीठाच्या परीक्षेत्राची सद्य:स्थिती (संदर्भ : देगलूर - उदगीर परिसर)<br>**डॉ. विठ्ठल जंबाले** | ६५-६९ |
| १४ | ग्रंथालय : सण व उत्सवांच्या माहितीचा खजिना<br>**डॉ. घ. ना. पांचाळ** | ७०-७३ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बौद्ध 'धम्म'<br>**डॉ. प्रियराज महेशकर** | ७४-७७ |
| १६ | विंदा : मराठी कवितेच्या परंपरेतील वेगळेपण<br>**प्रा. डॉ. अशोक नामदेव पळवेकर** | ७८-८२ |
| १७ | चर्मकार समाजातील शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>(विशेष संदर्भ : अमरावती तालुका)<br>**प्रा. डॉ. सुभाव के. पवार** | ८३-८६ |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १३. सीमाभागातील विद्यापीठाच्या परीक्षेत्राची सद्यःस्थिती (संदर्भ : देगलूर - उदगीर परिसर)

**डॉ. विठ्ठल जंबाले**
मराठी विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर.

तेलंगणा- कर्नाटक -महाराष्ट्र या तिन्ही राज्याच्या सीमाभागामध्ये विद्यापीठीय अभ्यासक्रम हे त्रिभाषा - त्रिविध संस्कृतीने प्रभावित आहेत. त्रिराज्य आणि या तिन्ही राज्यांच्या अंतर्गत सीमाभागालगत परीक्षेत्र जोडलेल्या विद्यापीठाने ठरविलेले अभ्यासक्रम सरहद्दवरील महाविद्यालयात अध्यापन करण्यात येतात. उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद, गुलबर्गा विद्यापीठ कलबुर्गी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अशा तीन नियमित विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाने तयार केलेले आणि महाविद्यालयीन पातळीवर शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम या परिसरात अध्यापन करतात. विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालय यांचा समन्वय ठेवून मागील अनेक वर्षापासून अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया गतिमान झालेली आहे.

मराठी अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, मराठी अभ्यास मंडळ, गुलबर्गा विद्यापीठ, कलबुर्गी (कर्नाटक) आणि मराठी अभ्यास मंडळ, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद या प्राधिकरणांकडून ठराविक अवधीनंतर मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येते. मराठी अभ्यास मंडळे विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि अलिकडे मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत उच्च शिक्षण आयोग या संस्थेकडून निश्चित केलेल्या आणि वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाशी संबंधित निकषानुसार अभ्यासक्रम ठरविण्यात येतात. त्यामध्ये राज्यसरकार आणि संबंधित विद्यापीठ ज्या प्रदेशाचे प्रतिनिधित्व करतात, ज्या परिसरात वसलेले आहेत, त्या परिसरातील साहित्य, संस्कृती आणि समाज यांच्याशी संबंधित वास्तव घटकांना कवेत घेऊन पुढे जाणारे अभ्यासक्रम ठरवितात. ते अभ्यासक्रम स्थल-काल-परिस्थितीशी सुसंगत असतात. म्हणून संबंधित परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रेरक ठरणारे, जगण्याचे बळ देणारे, भविष्यकालीन वाटचालीकरिता उपयुक्त ज्ञान-माहिती आणि संस्कार घडविणारे अभ्यासक्रम निश्चित करण्यात येतात. या सीमावर्ती देगलूर आणि उदगीर तालुका परिसरातील विद्यापीठांबद्दलची माहिती प्रथमतः पाहू.

**उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद**

उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद हे भारतामध्ये स्थापन झालेल्या जुन्या विद्यापीठांपैकी एक आहे. हैदराबाद संस्थान (निजाम स्टेट) अस्तित्वात असताना तत्कालीन राजे निजाम (सातवे) मीर उस्मान अली खान यांच्या कार्यकालात हे विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठाच्या स्थापनेपासून निजाम राजवटीचा अधिपत्त्याखालील हैदराबाद स्टेटमध्ये समाविष्ट मराठवाडा -तेलंगणा - म्हैसूर या तीन प्रदेशाचा समावेश होता. मराठवाडा हा मराठी मुलुख, म्हैसूर - कन्नड भाषिक आणि तेलंगणा- तेलगू भाषिक अशा

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

बहुविध भाषिक मुलुखामध्ये उर्दू-फारसीचे अभिमानी प्रशासक निजाम सुलतानांचा अंमल होता. या बहुभाषिक मुलुखामध्ये निजाम सम्राटाने लोककल्याणकारी योजना राबविताना शैक्षणिक क्षेत्रात उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद इ.स. १९१८ मध्ये स्थापन केले आणि त्याअंतर्गत निजामराजवटीतील शैक्षणिक केंद्र म्हणून ते पुढे आले. निजाम अंमल असलेल्या मराठी भाषिक मुलुखामध्ये या विद्यापीठामार्फत मराठी विषयाच्या उच्च शिक्षणाची सोय झाली. महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठाच्या अगोदर उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद हेच मराठी भाषिकांसाठी उच्च शिक्षणाचे केंद्र बनले. स्वातंत्र्यपूर्व काळात संपूर्ण भारतभर ब्रिटीश राजवटीतील मेकॉलेप्रणित शिक्षण प्रणाली राबवत असताना त्या समांतर काळात निजाम प्रशासनाने हैदराबाद संस्थानामध्ये मराठी भाषिकांच्या अध्ययनाची सोय केली. महाराष्ट्रातील मराठवाडा वगळता इतर मुलुख ब्रिटिशांच्या अंमलाखाली होता. परंतु मराठी भाषा आणि साहित्य अर्थात मराठी विषयातील पदवी अणि पद्व्युत्तर उच्च शिक्षणाची सोय केली. पर्यायाने विद्यापीठीय अभ्यासक्रम प्रथमतः हैदराबाद येथील निजाम प्रशासनाने उस्मानिया विद्यापीठाकडून ठरविले, राबविले. या विद्यापीठातून मराठी विषयातील विद्यापीठीय शिक्षण पूर्ण करणारी उच्च शिक्षित पहिली पिढी निर्माण झाली, बाहेर पडली. त्यानंतर महाराष्ट्रातील इतर विद्यापीठामध्ये मराठी विषयाची सुरूवात झाली. पुढील काळात इतर विद्यापीठे स्थापन झाली. तसेच मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. या दृष्टीने मराठी विषयाच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमाचा श्रीगणेशा करणारे आद्य विद्यापीठ म्हणून उस्मानिया विद्यापीठाचे स्थान अग्रगण्य आहे. ते मराठी भाषिक नाकारू शकत नाहीत.

सद्यःस्थितीत या विद्यापीठाचे परीक्षेत्र तेलंगणा राज्यातील हैदराबाद, निजामबाद, मेदक, संगारेड्डी, कामारेड्डी, वरंगल इ. ३२ जिल्ह्यामध्ये मर्यादित आहे. फक्त हैदराबाद शहरात मराठी भाषिकांची संख्या तीस लाखाहून अधिक आहे, असे सर्वेक्षणामधील अहवालातील नोंदी आहेत. तसेच तेलंगणा राज्यामध्ये मराठी भाषिकांची सध्या १ कोटीच्या आसपास लोकसंख्या आहे. या मराठी भाषिकांच्या विद्यापीठीय शिक्षणाचे केंद्र म्हणून या विद्यापीठाकडे आणि त्याच्याशी संलग्नित महाविद्यालयांकडे पाहणे संयुक्तिक ठरते.

**गुलबर्गा विद्यापीठ कलबुर्गी**

बिदर, रायचूर, बेल्लेरी, कोप्पल व गुलबर्गा या पाच जिल्ह्यांसाठी विद्यापीठीय शिक्षणाचे केंद्र म्हणून गुलबर्गा विद्यापीठाची स्थापना इ स. १९८० मध्ये कर्नाटक सरकारने केली. त्यापूर्वी इ.स. १९७० पासून ते कर्नाटक विद्यापीठ धारवाड यास संलग्नित विद्यापीठाचे उपकेंद्र होते. स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये १९५६ ला भाषावार प्रांतरचनेनुसार घटक राज्यांची निर्मिती करण्यात आली आणि कन्नड भाषिकांसाठी कर्नाटक राज्याची स्थापना करण्यात आली. परंतु मराठी बहूल गावे ८६५कर्नाटकात कोंबली. गुलबर्गा-बिदर परिसरातील अनेक अशा गावांचा कर्नाटक राज्यात समावेश केला. परंतु बृहन्महाराष्ट्रातील बहूल मराठी भाषिक गावे व मुलुख बिदर-गुलबर्गा जिल्ह्यात समाविष्ट केला आहे. त्यामुळे मराठी भाषिकांवर अन्याय होत आला आहे. कानडी शासन राजसत्तेचा बडगा उगारून मराठी माणसांची गळचेपी करीत आलेले आहे. तूर्तास मराठी आस्मिता दाबून टाकण्यात येत आहे. मराठी शाळा-महाचिद्यालये बंद पाडण्यात येत आहेत. किंवा त्यांचे अनुदान बंद करून जर्जर करण्यात येत आहेत. परिणामतः मराठी भाषा, संस्कृती आणि देशोधडीला लागत असून त्यांना राज्यशासनाशी समझोता करून आपले संसार टिकविणे आणि

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

जगणे महत्त्वाचे व कळीचे जाणवत आहे. राज्यसरकार, केंद्रसरकार आणि सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे याबद्दल याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. परंतु आजपर्यंत याप्रकरणात कर्नाटकात कोंबलेले मराठी भाषिक न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. यावर तोडगा निघत नाही. या परिसरातील विद्यापीठीय शैक्षणिक धोरण ठरविणारे केंद्र म्हणून गुलबर्गा विद्यापीठ कार्यरत आहे. या भगामधील प्राथमिक पूर्व ते विद्यापीठीय शिक्षणाची मराठी माणसांची गरज पूर्ण करण्यासाठी मराठी शिक्षणसंस्था, विद्यापीठे व विद्यालये निर्माण झाले. अमराठी प्रदेशात मराठी भाषिकांच्या शिक्षणाची सोय येथे झाली. त्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटकातील सीमाभागातील मराठी विषयात पद्विका, पदवी व पद्व्युत्तर शिक्षणाची व्यवस्था झाली.

गुलबर्गा विद्यापीठातील अनेक महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमात मराठी विषय समाविष्ट करण्यात आला. या विद्यापीठाच्या परिक्षेत्रात सद्यःस्थिती मराठी विषयातील अध्ययन आणि अध्यापनाची अतिशय दयनिय आवस्था आहे. मराठी विषय बंद पाडण्याची धोरणे कर्नाटक शासन राबवित आहे. परिणामतः मराठी अभ्यासक्रम आणि अध्ययन प्रक्रियेवर मोठे संकट कोसळले आहे. देगलूर आणि उदगीर या दोन्ही तालुक्यातील सीमा गुलबर्गा विद्यापीठास जोडून आहेत. सीमाभागात बऱ्याच बाबतीत आदान-प्रदान घडते. उच्च शिक्षणासाठी देगलूर परिसरातील विद्यार्थी गुलबर्गा विद्यापीठाच्या परिक्षेत्रांगर्तत एखाद्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठात आणि गुलबर्गा विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील शैक्षणि केंद्रांमध्ये अध्ययन करण्यासाठी जातात. तसेच तेथील अनेक तरूण शिक्षण, नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने देगलूर-उदगीर परिसरात येत असतात. उच्च शिक्षित पदवीधारक कालानुसार नोकरी व इतर संधी मिळवितात. अशाप्रकारे शैक्षणिक क्षेत्रातील आदान-प्रदान घडते.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड**

हैदराबाद स्टेटमधील मराठवाडा मुलुख स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये समाविष्ट करावा, या लढयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, गोविंद पानसरे, दिगंबरराव बिंदू, पोशट्टी उनप्रतवार यासारख्या अनेक समाजधुरिणांनी अंदोलने केली. लोकसहानुभूतीने लढा दिला. परिणामतः निजाम राजवटीखालून हैदराबाद स्टेट १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्त होऊन स्वतंत्र भारतीय गणराज्यात विलीन करण्यात आले. या लढयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान मोलाचे ठरले. त्यांनी नांदेड येथे नांदेड एज्युकेशन सोसायटी स्थापना करुन पीपल्स महाविद्यालय आणि सायन्स महाविद्यालय हे उच्च शिक्षणाचे केंद्र स्थापन केले. या कार्याची दखल घेऊन इ.स. १९९४ मध्ये हिंगोली-परभणी-लातूर-नांदेड या चार जिल्ह्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात आले. या विद्यापीठाचे स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड असे नामकरण केले. आज २०२० मध्ये प्रस्तुत विद्यापीठ महाराष्ट्रातील अग्रगण्य विद्यापीठामध्ये उत्तम दर्जा टिकवित आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मानांकनानुसार महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले विद्यापीठ, जळगाव विद्यापीठाच्या समकक्ष शैक्षणिक वाटचाल करीत आहे.

देगलूर -उदगीर तालुक्यातील परिसर तेलंगणा-कर्नाटक राज्याच्या सीमेस जोडलेला आहे. तसेच यास तेलंगणा राज्यातील उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद आणि कर्नाटकातील गुलबर्गा विद्यापीठ कलबुर्गी परीक्षेत्र आणि त्यास संलग्नित महाविद्यालयाच्या सीमा जोडून आहेत. उस्मानिया विद्यापीठातील मराठी विषय किंवा संबंधित अभ्यासक्रम बांसवाडा, बोधन, निजामाबाद येथील संलग्नित महाविद्यालयात शिकविण्यात येत नाही. साधारणतः अकरावी - बारावीच्या वर्गापर्यत (कनिष्ठ

ADAY VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded



महाविद्यालयीन स्तरापर्यंत) मराठी विषयाचे अध्यापन करण्यात येते. हैदराबाद येथे मराठी माध्यमांचे एक महाविद्यालय आहे. मराठी महाविद्यालयात मराठी विषय पदवी स्तरापर्यंत शिकवितात. तसेच उस्मानिया विद्यापीठात स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील निजामराजवटीपासून मराठी विषयातील विद्यापीठाअंतर्गत मराठी विषयाचे पदवी आणि पद्व्युत्तर अभ्यासक्रम सुरु होण्याअगोदर या विद्यापीठात मायबोली मराठीचे अध्ययन आणि अध्यापन सुरु झाले. मराठीतील अभ्यासकांची पहिली पिढी याच विद्यापीठातून पुढे आलेली आहे. त्यांनी मराठी भाषेच्या जडण-घडणीमध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात योगदान दिले. सत्तेच्या केंद्र बदलेले की, भाषेचे केंद्र बदलते. ज्ञानेशाच्याकालीन यादवसत्ता देवगिरी, शिवशाही-पेशवाईतील पुणे (परिसर), ब्रिटिशकाळात मुंबई आणि निजाम राजवटीमध्ये मराठवाडा मुलुखांमध्ये हैदराबाद ही सत्ताकेंद्र बनली. सत्ता केंद्रासभोवतीच्या भाषेचे केंद्र आणि शासन-व्यवस्थेकडून प्रशासनासाठी योजलेल्या भाषेचे अनविार्य भाषा म्हणून महत्त्व वाढविते. प्रमाणभाषा म्हणून सामान्यांच्या भाषेवर दूरगामी पडसाद उमटविणारे ठरले. त्यामुळे आजच्या मराठीत मध्यकाळ, आंग्लकाळ आणि निजाम प्रशासन यातील तत्कालीन मराठी, उर्दू-फारसीच्या पाऊलखुणा गडदपणे दिसतात.

देगलूर आणि उदगीर तालुक्यांची सरहद्द कन्नड मुलुखांमधील गुलबर्गा विद्यापीठ कलबुर्गी यास जोडलेली आहे. निजामशाही मध्ये मराठवाडा -म्हैसूर-तेलंगणा हे तिन्ही प्रांत हैदराबाद संस्थानच्या एकछत्री अंमलाखाली होते. त्यामुळे एकाच राज्यातील सध्याच्या महाराष्ट्रातील देगलूर आणि उदगीर तालुक्याच्या सीमाभागातील अनेक साम्यस्थळे दिसतात. सीमाभागातील कन्नड परिसरात औराद, बिदर, भालकी, कमलनगर, बसवकल्याण गुलबर्गा, हुमनाबाद येथील महाविद्यालयात मराठी विषयाचा विद्यापीठीय अध्यापनात समावेश केला. परंतु कर्नाटक प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे अनेक ठिकाणी मराठी विषयाचे अध्यापन बंद करण्यात आले किंवा बंद करण्यात येत आहे. परिणामतः बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या भाषा शिक्षणाची गळचेपी होत आहे. उपरोल्लेखित शहरातील गुलबर्गा विद्यापीठाशी संलग्नित बहुतांश महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापकाच्या सेवानिवृत्तीनंतर कर्नाटक सरकारने संबंधित विषयात पदभरती केलेली नाही. परिणामतः मराठी विषयाचे अध्यापन कार्य खंडित झाले. तसेच मराठी माध्यमांच्या महाविद्यालयास दीर्घकालापासून अनुदान किंवा शासनाकडून अर्थसहाय्य नसल्यामुळे विद्यापीठीय अभ्यासक्रमातील मराठी माध्यमांची व विषयाची दुर्गती झालेली आहे. सद्यःस्थितीत गुलबर्गा विद्यापीठ परिक्षेत्रात विद्यापीठस्तरीय मराठी विषयाच्या अध्यापनाची खूपच दयनीय स्थिती आहे. याकरिता सीमावर्ती भागातील मराठी शेजारी मुलखातील मराठीचा विस्कटलेला उध्वस्त होत असलेला संसार बघून भविष्यकालीन अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया नष्ट होऊन मराठी भाषेचा संहार होऊन धोक्याची घंटा वाजत आहे. तेलंगणा आणि कर्नाटक प्रांतामधून मराठी भाषेतील विद्यापीठीय अभ्यासक्रमातील अध्यापन प्रक्रिया हद्दपार होत जाणे, वैभव शिखरावरील मराठी बृहन्महाराष्ट्रात नेस्तनाबूत होण्याचा क्रम अनुभवणे मराठीचा अभ्यासक म्हणून अतिशय खेदजनक वाटते.

सीमाभागात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, गोखले विद्यापीठ पुणे, टिळक विद्यापीठ पुणे, मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठ हैदराबाद आणि कर्नाटक राष्ट्रीय विद्यापीठ धारवाड या विद्यापीठामार्फत अभ्यास केंद्र सुरू

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

आहेत. त्यामध्ये पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमासाठी मराठी हा विषय बहुधा उपलब्ध आहे. तेथील अभ्यासकांची स्थिती फारसी उत्तम नाही.

देगलूर आणि उदगीर तालुक्यात महाविद्यालय स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्याशी संलग्नित आहेत. या तालुक्यात बऱ्याच प्रमाणात कन्नड - तेलगु भाषिक जनसमुदाय वास्तव्य करतात. तसेच शेजारील कन्नड-तेलगु संस्कृतीचा आणि पर्यायाने भाषेचा प्रभाव अधिक आहे. या परिसरातील देगलूर मुक्रमाबाद-हणेगाव- घोणसी-उदगीर येथील महाविद्यालयातील विद्यापीठस्तरीय मराठी विषयाच्या अध्यापनाबाबतीत वास्तव अतिशय चांगले आहे, असे दिसत नाही. सीमाभागातील सांस्कृतिक सामाजिक संक्रमणामुळे भाषिक संमिश्रता ठसठसित होते. भिन्न भाषिक आणि मराठी भाषेतील नीट आकलन कक्षा विकसित न झालेल्या विद्यार्थ्यांच्या गळी उतरविणे अतिशय आवाहनात्मक आहे.

विद्यापीठस्तरीय मराठी विषयाचे प्रमाण मराठीतील लेखनविषयक नियमांना अनुलक्षून विद्यार्थ्यांना अध्ययन करणे आणि अध्यापकांना अध्यापन करणे खूप कसरतीचे काम आहे. म्हणून त्याचा सुवर्णमध्ये साधताना बोलीभाषेच्या पातळीवरीलन उपयोजन सुसंवाद घडविते. परंतु बहुतांश विद्यार्थी प्रमाण मराठीतील संकेताच्या भयाने या प्रक्रियेपासून अलिप्त राहून इतर विषयाकडे आकृष्ट होतात. त्यामुळे मराठी विषयातील आवड असणाऱ्या रसिक अभ्यासकांना संघर्ष करावा लागत आहे. हा संघर्ष पर्यायी विषयाच्या अध्यापकांशी कधी सलोखा तर कधी टोकाचा असतो. म्हणून मराठी विषयाचा प्राध्यापक आणि भाषा संशोधक या नात्याने मराठी अस्मिता वृद्धिंगत करण्यासाठी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या पातळीवर जाऊन प्रमाण मराठी आणि बोली यातील सुवर्णमध्ये साधणे उचित राहील.

**संदर्भ सूची**


- विदावन कुद्रे : वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन, कोल्हापूर, १९८७
- पाटील लीला - मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, व्हीनस प्रकाशन, पुणे
- संपा. भागवत श्री. पु. आणि इतर : साहित्य अध्यापन आणि प्रकार, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८७
- संकेतस्थळावरून माहिती-

  १. www.osmaniauniversity.in

  २. www.srtmun.ac.in

  ३. https//gug.ac.in
- क्षेत्रीय संकलनकार्य करीत असताना उपलब्ध माहिती
- उस्मानिया विद्यापीठ, गुलबर्गा विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांचे पदवी व पद्व्युत्तर पातळीवरील मराठीचे अभ्यासक्रम


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded